# आंबेडकरी चळवळीची ऐतिहासिक वाटचाल : काही निरीक्षणे

**गणेश अनिल सातपुते** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

Email : gas.rs.polsc@unishivaji.ac.in

---

**प्रस्तावना :**

जातींच्या अस्मिता टोकदार होत जाण्याच्या सध्याच्या काळात जातिअंताच्या लढाईची अधिक व्यापक पातळीवर जाऊन चर्चा होणे आवश्यक आहे. परदेशातील मानवतावादी, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते, समाजशास्त्रविद्याशाखेतील विद्यार्थी, अभ्यासक यांचा आंबेडकरी चळवळ हा अभ्यासाचा विषय ठरलेला आहे. भारतातील सामाजिक बदलांच्या लढ्याचा इतिहास आंबेडकरी चळवळीच्या उल्लेखाशिवाय पूर्णच होऊ शकणार नाही. धार्मिक व्यवस्था ही परिवर्तनवादी किंवा विद्रोही चळवळींना जन्म देण्यास कारणीभूत ठरल्याचे आपणास दिसून येते. आंबेडकरी चळवळीच्या उगमाला ही धर्मव्यवस्थाच कारणीभूत ठरलेली आहे. दलितांवरील अन्याय अत्यचार मोडीत काढण्यासाठी आंबेडकरी चळवळ संघर्षात्मक लढा निखाराने लढली. याच आंबेडकरी चळवळीने याच धर्मव्यवस्थेची चिरफाड करून तिचा दांभिकपणा वेशीवर टांगला. हीच आंबेडकरी चळवळ जातीय अन्याय अत्याचारांच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या लढाऊ तरुणांची जहाल संघटना म्हणून स्मरणात राहते. जातीय वर्चस्वाच्या जाणीवेला सत्ताधाऱ्यांची साथ मिळते, कामगार वस्तीतील तरुणांना भडकावून दलितांवर हल्ले घडवले जातात, ही परिस्थिती ५० वर्षापूर्वीसुद्धा होतीच. फक्त तेव्हा दलित पँथर नावाची विद्रोही संघटनात्मक चळवळ निर्माण झाली. या संघटनेने साहित्य, कविता यांमधून अभिव्यक्ती करत लेखी भूमिका घेत संघर्षाचा पवित्रा घेतला.

मात्र जेव्हापासून जागतिकीकरणाचे धोरण राबवण्यास सुरुवात झाली तेव्हापासून म्हणजे जागतिकीकरणानंतर शोषित वंचितांच्या न्याय हक्कासाठी संघटनात्मक लढा देण्यासाठी निर्माण झालेल्या आंबेडकरी चळवळीमध्ये शहरी आणि ग्रामीण समुदायामध्ये दरी पडताना दिसून येते. आंबेडकरी समुदायाची जबाबदारी, जागतिकीकरणानंतरच्या आंबेडकरी चळवळीची विचारधारा, जागतिकीकरणानंतरच्या आंबेडकरी चळवळीची बदलती भूमिका, आंबेडकरी चळवळ का एकसंध राहू शकली नाही, ती का वेगवेगळ्या गटात विभागली गेली, जागतिकीकरणानंतरची आंबेडकरी चळवळ समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत का पोहचू शकली नाही या वैचारिक तफावतीविषयी जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून या शोधनिबंधासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) आंबेडकरी चळवळीची वाटचाल अभ्यासने.

२) आंबेडकरी चळवळीच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन करणे.

**विषय विवेचन :**

आंबेडकरी चळवळीचा अभ्यास हा प्रामुख्याने तीन टप्प्यामध्ये केला जातो. एक आंबेडकरपूर्व दलित चळवळ, दोन आंबेडकरांची दलित चळवळ आणि तीन आंबेडकरोत्तर दलित चळवळ. जागतिकीकरणानंतरच्या दलित चळवळीचा अभ्यास करत असताना तिची पार्श्वभूमी या शोधनिबंधकार्यामध्ये समजून घेतली आहे, म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रीये दरम्यान दलित चळवळीच्या अनुषंगाने ज्या काही सामाजिक राजकीय घडामोडी घडल्या त्यांचा अभ्यास केला आहे. डॉ.बाबासाहेबांनी मनोदय केलेला आणि त्यांच्या अनुयायांनी बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने ३ ऑक्टोबर १९५७ रोजी 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाची स्थापना केली. या नवनिर्मित पक्षामध्ये पी.एन.राजभोज, बॅ.राजाभाऊ खोब्रागडे, आवळे बाबू, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, बी.सी.कांबळे, आर.डी.भंडारे, दत्ता कट्टी, ॲड.रुपवते इ. नेते कार्यकर्ते यांचा समावेश होता.पक्षास्थापनेला एक वर्ष होताच १९५८ मध्ये पक्षात पहिली फुट पडली. या पहिल्या फुटीतून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा एक गट तर बी.सी.कांबळे यांचा दुसरा गट निर्माण झाला. बऱ्याच घडामोडी नंतर १९७१ मध्ये दादासाहेब गायकवाड यांच्या निधनानंतर त्यांचा गट रा.सु.गवई यांच्या नेतृत्वाखाली काम करू लागला तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व हे बॅ.राजाभाऊ खोब्रागडे यांच्याकडे आले. १९७४ मध्ये बी.सी.कांबळे, गवई, खोब्रागडे आणि भैय्यासाहेब आंबेडकर यांच्येमध्ये ऐक्य घडून आले. या दरम्यानच्या काळात १९७० च्या आसपास दलित मागासवर्गीय जातींवरील अन्याय अत्याचारात देशभरात वाढ झाली तेव्हा त्याविरोधात लढण्यासाठी दलित तरुण आणि साहित्यिक मैदानात उतरले. दलितांवरील अत्याचारांच्या विरोधात लढा देण्यासाठी मुंबईतील कामाठीपुर सिद्धार्थ नगर येथे ९ जुलै १९७२ रोजी संतप्त पिढीतील संवेदनशील लेखक, कवी, तरुण यांचा जाहीर मेळावा भरला आणि याच ठिकाणी 'दलित पँथर' या लढाऊ संघटनेची स्थापना करण्यात आली. दलित

पँथरच्या स्थापनेत आघाडीचे साहित्यिक नेते नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि.पवार, अविनाश महातेकर, जयदेव गायकवाड इ.चां समावेश होतो. भारतातील सामाजपरिवर्तानाच्या चळवळीतील दलित पँथर या संघटनेच्या स्थापनेचे व त्यांनी केलेल्या चळवळीचे मोठे महत्त्व आहे. आंबेडकरोत्तर कालखंडातील ती एक मोठी चळवळ होती. दलित अत्याचाराविरोधात आंदोलन करणे आणि दलित साहित्य चळवळीला प्रोत्साहन देणे हा दलित पँथरचा मुख्य कार्यक्रम होता. मे १९७७ मध्ये औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी दलित पँथरच्या नेत्यांनी केली. त्यासाठी मोर्चे, घेराव, बंद या मार्गाने आंदोलन करण्यात येऊ लागले आणि अशाप्रकारे नामांतर चळवळीला सुरुवात झाली. दरम्यानच्या काळात दलित पँथर संघटनेमध्ये काही कारणास्तव फुट पडून चळवळ अनेक गटामध्ये विभागली गेली. त्यानंतर लढवय्ये नामदेव ढसाळ व राजा ढाले यांच्याकडे असलेले नेतृत्व अनेक स्थित्यंतरातून रामदास आठवले यांच्या कडे आले. 'भारतीय दलित पँथर' या नावाने १९७७ ते १९९० असा प्रवास रामदास आठवले, प्रा.अरुण कांबळे, गंगाधर गाडे, एस.एम.प्रधान, प्रीतमकुमार शेगावकर, दयानंद म्हस्के, अनिल गोंडाने आदींसह झाला आणि नंतर ही संघटना बरखास्त झाली. याच दरम्यान १९८३-८४ मध्ये प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी सम्यक समाजाच्या माध्यमातून चळवळ सुरु केली व पुढे 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला. मात्र पुन्हा एकदा नव्याने विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्य रक्षणासाठी दलित चळवळीत ऐक्याची भावना निर्माण होऊन डिसेंबर १९८९ मध्ये त्यांच्यामध्ये ऐक्य घडून आले. सर्व दलित नेते मंडळीनी आपल्या समाजाचे नेतृत्व एकीने केले परंतु राजकीय विचार एक न झाल्याने पुन्हा एकदा १९९० मध्ये आंबेडकरी चळवळ आणि रिपब्लिकन पक्षात फुट पडली. प्रकाश आंबेडकर, बी.सी.कांबळे, राजा ढाले यांचा एक गट तर गवई, आठवले, कवडे यांचा एक गट निर्माण झाला. राजकीय युती कोणासोबत करायची या मुद्द्यावरून आठवले, गवई, कवाडे, खोब्रागडे यांचे गट निर्माण झालेले दिसतात. 'रिपब्लिकन' नावाचा वापर करून अनेक गट निर्माण होतात व फुटतात. रिपब्लिकन पक्ष अनेक गटात विभागाला गेला असला तरी, तो आंबेडकरी चळवळीचा वारसा असल्याने या पक्षास पाठिंबा देणाऱ्या सामाजाघटकांमध्ये भावनिक ऐक्य असल्याने या पक्षामध्ये व नेतांमध्ये ऐक्य घडावे असे या समुदायाला वाटते. बहुजनांच्या राजकीय सहभागामुळे व राजकीय उलाढालीमुळे दलित चळवळीमध्ये प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी एक नवीन फेज आणली. ओ.बी.सी. समुदायामधील राजकीय जाणीव तीव्र झाली आहे. बहुजन समाजाच्या एक्यातून राजकीय परिवतर्न करण्यासाठी मागासवर्गातील शेतकरी, कामगार, स्त्रिया, मुस्लीम आणि दलित या सर्वांना केंद्रस्थानी ठेऊन २३ सप्टेंबर १९९० रोजी सुरुवातीस अकोला येथे जिल्हापातळीवर प्रकाश आंबेडकर व मखराम पवार यांनी 'बहुजन महासंघ' स्थापन केला. १५ फेब्रुवारी १९९३ रोजी बहुजन महासंघाची राज्यपातळीवर सर्वत्र स्थापना झाली. भारिप व बहुजन महासंघ यांनी मिळून दलित व ओ.बी.सी. जातींच्या एकजुटीतून अकोला पॅटर्न राबवला राबवला. १९९३-१९९६ पर्यंत या दोन्ही संघटनांनी मिळून एकत्रितपणे कां केले. नंतर दोहोंची मिळून एकच संघटना अस्तित्वात आली. त्यानंतर २० मे २०१८ रोजी पंढरपूर येथे झालेल्या धनगर समाज मेळाव्यात "वंचित बहुजन आघाडी" हे नाव सर्वप्रथम वापरले गेले. या सोहळ्याचे अध्यक्षपद प्रकाश आंबेडकर यांना देण्यात आले होते. यानंतर अनेक शोषित, वंचित असलेल्या आणि ज्यांच्यावर सतत अन्याय होत आलेला आहे अशा समाजांच्या संघटना यात सहभागी होत गेल्या.

जून २०१८ मध्ये, लक्ष्मण माने, हरिदास भदे आणि विजय मोरे यांच्या प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत झालेल्या एका बैठकीत सर्व पुरोगामी पक्षांची 'वंचित बहुजन आघाडी' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आघाडीत सर्व पुरोगामी पक्ष असतील. प्रत्येक पक्षाचं अस्तित्व कायम ठेवून ही आघाडी केली जाईल. अशाप्रकारे आघाडीची वैचारिकता आंबेडकरांनी स्पष्ट केली. त्यानंतर २० मे २०१८ रोजी आंबेडकरांनी वंचित बहुजन आघाडीची स्थापना केली. वंचित बहुजन आघाडीने भारतीय संविधानाचा सरनामा हाच त्यांचा जाहीरनामा असल्याचे सांगितले. या जाहीरनाम्यात वेगवेगळ्या २७ मुद्द्यांवर भर देण्यात आला होता. त्यामध्ये केजी ते पीजी मोफत शिक्षण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत आणणे, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा दर्जा देणे, तसेच शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवणे अशी अनेक आश्वासने या जाहीरनाम्यात देण्यात आलेली होती.

कांशीराम आणि डी.के.खापर्डे यांनी १९७८ मध्ये बामसेफ [Backward and Minority Communities Employees Federation] ही संघटना स्थापन केली. ही संघटना नोकरदार वर्गाचे संघट करत होती तिची भिस्त बहुजन समाज हीच आहे. १४ एप्रिल १९८४ रोजो 'बहुजन समाज पक्ष' कांशीराम यांनी स्थापन केला. परंतु त्याची दखल महाराष्ट्रातील दलित नेत्यांनी घेतली नाही. बहुजनांचे संघटन हा मुद्दा पुढे घेऊन बसपा नवबौद्ध व ओ.बी.सी. जातींचा मेळ घालून दलित चळवळीमध्ये कार्यरत होत आहे. अशाप्रकारे दलित चळवळीच्या या तिसऱ्या टप्प्यामध्ये रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर

चळवळ, दलित साहित्य चळवळ, बामसेफ, भारतीय रिपब्लिकन पक्ष, बहुजन महासंघ आणि बहुजन समाज पक्ष या व अनेक आंबेडकरी विचारधारा अंगिकारलेल्या संस्था संघटना यांनी वेळोवेळी केलेल्या चळवळीचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्रात गायरान जमिनी, बेघरांना घर, भूमिहीन शेतमजुरांना जमिनी मिळाव्या म्हणून अनेक संस्था संघटना यांनी लढे दिले, आंदोलने केली याबाबतही आंबेडकरी चळवळीने आपला लढा उभा केला आहे. दलित हत्याविरोधी मानवी हक्क चळवळी जे कार्य करत आहेत त्यांची दखल वेळोवेळी आंबेडकरी चळवळीकडून घेण्यात आली आहे. जागतिकीकरणा नंतर दलित चळवळीच्या अनुशंगाने सामाजिक राजकीय कार्य दलितांसाठी केले गेले त्या सर्व संस्था संघटना पक्ष नेते कार्यकर्ते त्यांची विचारधारा त्यांची राजकीय भूमिका या कार्यपद्धतीचे अवलोकन आंबेडकरी चळवळीतून होत जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नागपुरात जिवंत केलेली मानवमुक्तीची, मानवी स्वातंत्र्याची चळवळ जी शांत झालेली आहे तिचे पुनरुज्जीवन होणे खूप महत्त्वाचे आहे. कारण इथे चळवळ करणारे आणि चळवळीचा लाभ घेणारे असे दोन वेगवेगळे वर्ग तयार झालेले आहेत ते नष्ट करणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर वेळोवेळी चळवळीचा आराखडा काढून काय मिळवले? काय गमावले? आणि काय मिळवायचे बाकी आहे? याचा लेखाजोखा करून आंबेडकरी चळवळीमध्ये विचारमंथन होणे गरजेचे आहे. हे करण्यासाठी वैचारिक संवाद महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनासाठी आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक आंदोलनात्मक ऐक्य जोपासणे गरजेचे आहे. ज्याचा उद्देश शोषित-वंचित घटकांमध्ये बंधुभाव निर्माण करून डॉ.बाबासाहेबांना अपेक्षित मानवमुक्तीच्या लढ्यात शोषित-वंचित घटकांना सामील करून घेणे हा असावा.

**संदर्भ सूची :**

1.खैरमोडे चांगदेव, (१९७६), 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी', श्री.विद्या प्रकाशन, पुणे.
2.मुरुगल लता, (२०१५), 'दलित पॅथंर चळवळ', सुगावा प्रकाशन, पुणे.
3.भोळे भास्कर लक्ष्मण, (१९९९), 'विसावे शतक आणि भारतीय समता विचार', डॉ.आंबेडकर अकादमी, सातारा.
4.प्रा.डोळस अविनाश, (१९९५), 'आंबेडकरी चळवळ परिवर्तनाचे संदर्भ', सुगावा प्रकाशन, पुणे.
5.जोगदंडे पी.पी., (१९९४), 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ', समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
6.ऑम्व्हेट गेल, (१९९५), 'वासाहातीक समाजातील सांस्कृतिक बंड', सुगावा प्रकाशन, पुणे.
7.पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, (२०११), 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल', समकालीन प्रकाशन, पुणे.